# नॅशनल बल्क हँडलिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. विजय केळकर

मुंबई, दि. २२ (वृत्तसंस्था) - ॲग्री-वेअरहाऊझिंग सेवा देणारी भारतातील सर्वात मोठी खाजगी पुरवठादार असलेल्या नॅशनल बल्क हँडलिंग असोसिएशन (एनबीएचसी)ने पद्म विभूषण पुरस्काराचे मानकरी आणि अतिशय विख्यात डॉ. विजय केळकर यांची स्वतंत्र संचालक आणि अध्यक्ष म्हणून नेमणूक करून आपले मंडळ अधिक सक्षम केले आहे. प्रतिथयश अर्थतज्ज्ञ आणि यापूर्वी वित्त मंत्रालयातील आर्थिक घडामोडी विभागाचे सल्लागार म्हणून काम केलेल्या डॉ. अजय एन. शहा यांची स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. खाजगी इक्विटी फर्म असलेल्या इंडिया व्हॅल्यू फंडने या कंपनीच्या व्यवस्थापनाचा ताबा घेतल्यानंतर या घडामोडी घडल्या आहेत. या वर्षाच्या सुरूवातील इंडिया व्हॅल्यू फंड ॲडव्हायझर्सने नॅशनल बल्क हँडलिंग असोसिएशनवर ताबा मिळवल्यापासून नव्या पालक कंपनीने संचालक मंडळावर चार भागिदारांच्या नियुक्त्या केल्या आहेत. या नियुक्त्यांमध्ये दिव्य सहगल, श्रीकृष्ण द्वाराम, विक्रम निरूला आणि प्रमोद काब्रा यांचा समावेश आहे. आयव्हीएफएचे हे भागिदार मंडळावर पूर्णवेळ संचालक म्हणून काम पाहतील.